*प्रकरण पहिले*

# सदानंद देशमुखपूर्व मराठी ग्रामीण कादंबरी

**प्रस्तावना**

आधुनिक मराठी वाङ्मयाचा विचार करताना आपणास असे दिसून येते की, आधुनिक जाणिवांनी युक्त असे साहित्य आपल्या देशात एकोणिसाव्या शतकाच्या आरंभापासून लिहिले जात आहे. सुरुवातीच्या काळामध्ये इतर भाषांमधील साहित्याचा आधार घेऊन त्यांची मराठीत भाषांतरे झाली आहेत. नंतर काळ बदलला आणि भारतीय माणूस सज्ञान झाला. त्याची अस्मिता जागृत झाली आणि त्याने आपल्या विचारांना वाट करून देण्यासाठी लेखणीला जवळ केले. परिणामी वैचारिक पातळीवरील लेखनास सुरुवात झाली. नंतरच्या काळात समाजातील अनेक समस्या साहित्याच्या माध्यमातून अवतरू लागल्या. यामध्ये कथा, कादंबरी, नाटक, काव्य इत्यादी वाङ्मयप्रकार उदयाला आले आणि चौफेर अंगानी साहित्य लेखनाला गती मिळाली. परिणामी मराठी वाङ्मयाचा विस्तार मोठ्या प्रमाणात झाला.

कादंबरी या वाङ्मयप्रकारचा विचार केला तर 'कादंबरी'ला आज एक प्रधान वाङ्मयप्रकार म्हणून जागतिक मान्यता आणि लोकप्रियता मिळत आहे. तरी कादंबरीचा विकास प्रथमत: पाश्चात्य देशांमधेच झाला. खऱ्या अर्थाने अठराव्या शतकातच तिचे रूप उत्क्रांत झाले आणि एकोणिसावे शतक उजाडण्यापूर्वीच एक प्रधान साहित्यप्रकार म्हणून कादंबरी प्रतिष्ठित झाली. आपणास 'कादंबरी' या शब्दाची कथाही चमत्कारिक वाटते. कारण 'कादंबरी' या शब्दाचे कोशगत अर्थ मराठीत तरी कल्पित कथा, कहाणी असे आहेत. या कांदबरी वाङ्मयप्रकाराचे सामाजिक कादंबरी, ऐतिहासिक कादंबरी, पौराणिक कादंबरी, राजकीय कादंबरी, ग्रामीण कादंबरी असे विविध प्रकार

पडतात म्हणून कादंबरी या वाङ्मयप्रकारचा अभ्यास अनेक दिशांनी आपणाला करता येतो. कारण आकलनाच्या संदर्भात अभ्यासकांना आव्हान देण्याचे फार मोठे सामर्थ्य या वाङ्मयप्रकारात आहे. म्हणूनच कादंबरी या वाङ्मयप्रकाराची योग्य अशी एका वाक्यात व्याख्या करणे शक्य नाही. आणि व्याख्या केली तरी ती दीर्घ होते. त्यामुळे कमीत कमी शब्दांत सर्वसमावेशक अशी व्याख्या करणे शक्य झालेले नाही. कारण हा वाङ्मयप्रकार दिवसेंदिवस वाढत व बदलत चालला आहे.

## कादंबरीची व्याख्या आणि तिचे स्वरूप

वाङ्मयीन क्षेत्रात एखाद्या विशिष्ट स्वरूपाच्या वाङ्मयप्रकाराचा निर्देश करण्यासाठी 'कादंबरी' ही संज्ञा मराठी समीक्षेमध्ये रूढ झालेली आहे. कादंबरीविषयीच्या विवेचनामध्ये आरंभी 'कादंबरी' या संज्ञेचीच व्याख्या करणे योग्य ठरते. कादंबरीचा अर्थबोध होण्यासाठी तिच्या व्याख्येत 'कादंबरी'चे लक्षण अचूक आणि कमी शब्दांत ग्रथित झाले पाहिजे. कादंबरी म्हणजे काय हे सांगणाऱ्या अनेक व्याख्या अनेक समीक्षकांनी केल्या आहेत. पण कादंबरी हा वाङ्मयप्रकार जीवनप्रवाहाबरोबर चालणारा, वाढणारा, बदलत जाणारा साहित्यप्रकार आहे. म्हणून तिचे स्वरूप समाजजीवनासोबत बदलत चालले आहे. तिचे तंत्र व विषय यातही भरपूर विविधता आली आहे. त्यामुळे सर्वच कादंबऱ्यांना लागू पडेल अशी सुटसुटीत व्याख्या मात्र आजपर्यंत कोणाला करता आलेली नाही. या संदर्भात उषा हस्तक लिहितात, ''कादंबरी लेखनाला प्रवृत्त होण्यापूर्वी कादंबरीकारांनी आणि टीकेचे घाव घालण्यापूर्वी टीकाकारांनी, कादंबरीच्या कथात्मक रूपाची अंगभूत वैशिष्ट्ये शोधण्याची नितांत गरज होती. पण एक हरिभाऊ सोडले, तर या दिशेने आणखी कोणाची जाणती पावले पडलेली आहेत, असे आढळत नाही. अन्य कथात्मक वाङ्मयप्रकाराहून कादंबरीचे वेगळेपण काय? हे समजावून न घेतल्यामुळे 'कादंबरी' असे नेमके कोणत्या लेखनाला

म्हणावे याविषयी निश्चित अशा कल्पना आकाराला येवू शकल्या नाहीत तिच्या रचनेची मूलतत्त्वे गवसू शकली नाहीत.''[१]

कादंबरीच्या संदर्भात पाश्चात्यांची मते: पाश्चात्य कादंबरीचा जनक फिल्डिंग याच्या मते, 'गंभीर वातावरण असलेले गद्य महाकाव्य म्हणजे कादंबरी होय.' तसेच ई. एम. फॉस्टर या इंग्रजी कादंबरीकाराने 'पन्नास हजार शब्दांहून अधिक विस्तार असलेली कल्पित गद्यकथा म्हणजे कादंबरी होय' असे म्हटले आहे. तर एच. जी. वेल्स या प्रख्यात लेखकाने, 'ज्यात सर्व काही सामावेल अशी गारुड्याची थैली' असे कादंबरीचे वर्णन केले आहे. अठराव्या शतकात फिल्डिंग याने 'टॉम जोन्स' या नावाचे पुस्तक लिहिले. तोच अर्वाचीन कादंबरीचा जन्म आहे, असे अनेक टीकाकार मानतात. याशिवाय रिचर्डसन, स्मॉलेट व स्टर्न हे फिल्डिंग यांचे समकालीन कादंबरीकार असून या चौघांनी कादंबरीला विशिष्ट रूप प्राप्त करून दिले असे मानले जाते.

वाङ्मयीन संज्ञा स्पष्ट करणाऱ्या इंग्रजी कोशामध्ये 'नॉव्हेल' (कादंबरी) या संज्ञेची व्याख्या दिली आहे ती पुढील प्रमाणे:

"The term novel is now applied to a great varity of writings that have in common only the attribute of being extended works of prose fiction. As an extended narrative, the novel is distinguished from the short story and from the work of middlc length called the "novelette", its magnitude permits a greater variety of characters, greater complications of plot (or plots), an ampler development of milieu, and a more sustained and subtle explorations of character than do the shorter, hence, necessarily more Concentrated modes"[२]

इंग्रजी कोशामध्ये दिलेली वरील व्याख्या पडताळून पाहिली तरी सर्वसमावेशक अशी एकही व्याख्या आढळत नाही. कारण कादंबरीच्या वेगवेगळ्या व्याख्यामध्ये सर्वसामान्यपणे काही

अंशाचेच दर्शन घडते. अभ्यासकांच्या तात्त्विक विवे मध्ये कादंबरीच्या स्वरूपाची निश्चिती करण्यासाठी एक निकष उपयोजिला आहे, तो म्हणजे तवतेचा. हा निकष सर्वांनाच मान्य आहे असे नाही. कारण वास्तवतेचे बंधन न मानणाऱ्या प्रवृत्तीच्या कादंबरीकाराला तो निकष लावता येत नाही. काही प्रयोगशील कादंबरीकारही वास्तवतेचे बंधन मानत नाहीत. कारण वास्तवतेचा आणि कादंबरीचा काही संबंध नाही, असे याचे मत आहे. असे जरी असले तरीही कादंबरीच्या वास्तववादी रूपाला तात्त्विक चर्चेत अधि न मिळालेले आहे. कारण 'कादंबरी' या वाङ्मयप्रकारचा इतिहास घडविणारे अनेक कादंबरीकार स्तवतेचा स्वीकार करणारे आहेत. म्हणून 'द राईज ऑफ द नॉव्हेल' या आपल्या ग्रंथात 'इयान वॅट ा अभ्यासक म्हणतो.

"With the help of their larger persp tive the historians of the novel have been able to do much more to deter ne the idiosyncratic features of the new form. Briefly, they have seen 'rea n' as the defining characteristic which differentiates the work of early e hteenth century novelists from previous fiction"[3]

इयान वॅट या अभ्यासकाच्या वरील विधानावर असे लक्षात येते की, पूर्वीच्या कथात्मक वाङ्मयाहून नव्याने निर्माण झालेल्या 'कादंबरी'या ाङ्मयप्रकाराचे मुख्य रूप अधोरेखित करण्यासाठी 'रिॲलिझम' म्हणजे वास्तवता हेच मुख्य शिष्ट्य ग्राह्य धरले आहे. आपण आता हिंदी समीक्षक कांदबरीच्या संदर्भात कशा व्याख्या करत ते पाहू.

हिंदी कादंबरीकार प्रेमचंद कादंबरीविषयी लि ात, "मैं उपन्यास को मानव चरित्र का चित्र-मात्र समझता हूँ। मानव - चरित्र पर प्रकाश डालन और उसके रहस्यों को खोलना ही उपन्यास का मूल तत्व है।"[४] तसेच हिंदी कादंबरीकार अज्ञेय संदर्भात लिहितात, "उपन्यास व्यक्ति के

अपनी परिस्थितियों के साथ सम्बन्ध की अभिव्यक्ति के उत्तरोत्तर विकास का प्रतिनिधित्व करता है।"[५]

मराठी कादंबरीच्या व्याख्येचा आपण जेव्हा शोध घेतो, तेव्हा आपणास अनेक अभ्यासकांनी वेगवगेळ्या प्रकारची व्याख्या केलेले दिसून येतात. भालचंद्र नेमाडे कादंबरीच्या व्याख्येविषयी लिहितात, "कादंबरी म्हणजे प्रदीर्घ भाषिक अवकाश असलेली, आशयाचे अनेक पदर असलेली त्यामुळे विस्तृत संरचना मांडणारी अनेक पात्रे-प्रसंग अपूर्णतेपेक्षा संपूर्णतेकडे झुकलेली आहेत अशी साहित्यकृती असते."[६]

तसेच आपण अनुक्रमे बापट-गोडबोले, श्री. म. कुलकर्णी आणि ना. सी. फडके यांच्या कादंबरीविषयीच्या व्याख्या पाहू:

"सत्य सृष्टीच्या आधाराने काल्पनिक प्रतिसृष्टी निर्माण करून काल्पनिक पात्रांची स्वभावचित्रे व काही अंशी तद्‌वलंबित जीवित घटना यांचे गोष्टीरूपाने वर्णन करून कलानंदाची प्राप्ती करून, जीवितातील गुंतागुंतीच्या प्रश्नावर प्रकाश टाकणारा गद्य विभाग."[७]

- प्र.वा. बापट व ना.वा. गोडबोले.

"कार्यकारण शृंखलाबद्ध अशा कल्पित कथानकाद्वारा मानवी जीवनाचे दर्शन घडविणारी सविस्तर ललित गद्य-कथा म्हणजे कादंबरी."[८]

- श्री. म. कुलकर्णी

"एखाद्या व्यक्तीची विशिष्ट इच्छा अनेक अडचणीतून आणि संकटातून मार्ग काढून कशी सिद्धीस गेली अगर तिची कशी मोडतोड झाली याची कहाणी म्हणजे कादंबरी."[९]

- ना. सी. फडके

अशा पद्धतीने कादंबरीची व्याख्या आणि तिचे स्वरूप विशद करता येते. तरी आपण पुढील भागात कादंबरीचे प्रयोजन आणि रचनातंत्र अभ्यासू.

## कादंबरीचे प्रयोजन आणि रचनातंत्र

कादंबरीच्या निर्मितीमागील प्रेरणा या वास्तव समाजाशी संबंधीत असल्यातरी तिच्या विश्वात या समाजातील प्रतिबिंब न्यायाने उमटत नाही. म्हणून सहेतूक केल्या जाणाऱ्या या वाङ्मयीन निर्मितीला प्रयोजन असते. या समाजात प्रत्येक क्षणी विविध पातळीवर अनेक घडामोडी घडत असतात. या घडामोडी ज्यावेळी संवेदनशील कादंबरीकाराच्या अनुभवाचा आणि चिंतनाचा विषय बनतात त्याचवेळी तो त्याला जाणवलेल्या जीवनविषयक वास्तवाच्या विशिष्ट पद्धतीची एक कल्पित, अर्थपूर्ण रचना शब्दमाध्यमाचे उपयोजन करून लेखक निर्माण करतो. त्यावेळेस कादंबरीच्या वाचनातून मिळणारा आनंद हा इतर कलाकृतीच्या आस्वादातून मिळणाऱ्या आनंदासारखाच असतो. म्हणून वेगवेगळ्या लेखकांच्या वेगवेगळ्या अनुभवांच्या कादंबऱ्या आपणाला निरनिराळ्या कारणासाठी आवडतात.

कोणाला वि. स. खांडेकरांची 'ययाति' आवडते तर कोणाला आनंद यादव यांची 'झोंबी' आवडते, कोणत्याही चांगल्या कलाकृतीचे कथानक हे कोणत्यातरी वास्तवावर आधारित असते म्हणून कादंबरीकाराला जीवनातील जाणीवा स्पष्टपणे आकलन झाल्या पाहिजेत. याविषयी उषा हस्तक लिहितात, ''कादंबरीमध्ये मानवी जीवन व्यवहारांचे दर्शन घडविले जात असल्यामुळे, तिच्या आकलनासाठी ह्या जीवनव्यवहारांचा अभ्यास करणाऱ्या इतर ज्ञानशाखांचीही मदत होण्याची शक्यता असते. उदाहरणार्थ मानसशास्त्र, समाजशास्त्र, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, तत्त्वज्ञान इत्यादी परंतु ह्या शास्त्रातील सिद्धांताच्या आधारे कादंबरीच्या विश्वातील व्यक्तींच्या जीवनव्यवहारांची संगती लावणे म्हणजे 'कादंबरी'चे आकलन नव्हे, ह्याचेही भान ठेवावे लागते''[१०] त्यांनी संपन्नतेने

SHIVAJI ... KOLHAPUR

घेतलेला अनुभव तितक्याच अचूकपणे त्याला चित्रित करता आला पाहिजे. हे करताना अपरिहार्यतेने आवश्यक वाटाव्या अशा घटना व प्रसंग जिवंत व्यक्तिचित्रण, अकृत्रिम संवाद आणि नेमकी सरळ भाषा यातून त्याला कथावस्तू तिच्या जीवसूत्रासह प्रभावीपणे उभी करता आली पाहिजे. हे सर्व त्याला त्यांच्या प्रतिभेने सहज साध्य करून दिले तर त्यांची कादंबरी चांगली होईल.

कोणतीही कलाकृती सहज निर्माण होत नाही ती विशिष्ट अशा घटकांच्या साहाय्याने निर्माण होत असते. या घटकांच्या मूळरूपाला कलादृष्ट्या योग्य ती परिमाणे नसतात. म्हणून ती योग्य त्या आकारात बसविल्यावरच त्यांना परिमाणे लाभत असतात. या घटकांची मूलभूत गुणवत्ता कितीही चांगली असली तरी जोपर्यंत कलातत्त्वांनी सिध्द होत नाही, त्यांचे योग्य असे रूप आपल्याला पटत नाही; तोपर्यंत त्याला कोणत्याही प्रकारे अर्थपूर्णता येऊ शकत नाही. म्हणून मूळ घटकाला आकारात बसविण्याची प्रक्रिया ही कादंबरीच्या रचनेचीच प्रक्रिया असते. यासाठी ही सर्व प्रक्रिया ज्या तंत्राच्या सहकार्याने घडते तेच कादंबरीचे रचनातंत्र होय.

कादंबरीला साकार करणाऱ्या तपशिलांची निर्मिती म्हणजे तिला आकार देण्याचीच प्रक्रिया आहे. या तपशिलांच्या आधारेच तिच्या अभिव्यक्तीची निश्चित परिमाणे आपल्याला जाणवू शकतात. व्यक्ती, वातावरण, निवेदन, काल, प्रधान व्यक्तिरेखा कार्यकारण भावात्मक या घटकांच्या सहाय्याने कादंबरीची रचना आकाराला येते ते आपण पाहू.

## १. व्यक्ती

कादंबरीच्या रचनेत व्यक्ती हा एक महत्त्वाचा घटक असतो. कादंबरीची रचना करताना कादंबरीतील कल्पित व्यक्तींची निर्मिती कशा प्रकारे केलेली आहे, म्हणजेच त्यांची मानसिक जडणघडण व तिचे त्या साहित्यकृतीवर झालेले परिणाम पाहाता येतात. व्यक्तींची परस्परांशी असलेली नाती, त्यांच्या वैचारिक भूमिका, जीवनाकडे पाहण्याचा दृष्टीकोण, त्यांच्या

जीवनसंघर्षाचे स्वरूप या गोष्टी महत्त्वाच्या असतात. कादंबरीच्या केंद्रस्थानी कल्पिलेली व्यक्ती, व्यक्तिवर दिलेले कमी जास्त आघात इत्यादीचे आकलन अशा अनेक अंगानी पडताळा घेता येतो.

## २. वातावरण

कादंबरी क्षेत्रात 'वातावरण' हा घटक खूप महत्त्वाचा आहे. कारण वातावरणनिर्मिती हा कादंबरीचा एक लक्षणीय विशेष मानण्यात येते. कादंबरीतील व्यक्तींच्या अंतर्बाह्य वर्तनाला चालना देण्याचे फार मोठे सामर्थ्य 'वातावरणा'मध्ये असते. कादंबरीमधील व्यक्ती कादंबरीकाराच्या कल्पनाशक्तीने तयार केलेल्या वातावरणात जगत असते. म्हणून कादंबरीतील वातावरणाचे स्वरूप वर्णनात्मक पातळीवर राहत नाही, तर कादंबरीच्या रचनेचाच एक महत्त्वपूर्ण हिस्सा बनतो.

## ३. निवेदन

कोणत्याही कादंबरीकाराला आपली कादंबरी प्रभावी करायची असेल तर गतिमान निवेदन अवलंबावे लागते. त्यातून सर्व घटकांचे तपशील कादंबरीकाराला पुरविता येतात. आणि कोणतीही कादंबरी भाषिक निवेदनाच्या मदतीशिवाय वाचनीय होत नाही. म्हणून कादंबरीच्या रचनेत भाषिक निवेदनाला अतिशय महत्त्व आहे.

## ४. काल

प्रत्येक कादंबरीकार हा कांदबरीतील विविध घडामोडी ज्या विशिष्ट कालावधीमध्ये घडत असतात, त्या कालावधीचा उपयोग करून 'काला'चे एक सूत्र आपल्या हाती ठेवत असतो म्हणून कादंबरीला परिपक्वपणा येतो.

## ५. व्यक्तिरेखा

बहुसंख्य कादंबरीमध्ये अनेक व्यक्तींच्या बाबतीत घडणाऱ्या घडामोडींचे निवेदन एकाच वेळी करता येणे अशक्य असते. त्यामुळे कादंबरीतील प्रधान व्यक्तिरेखा ही निवेदनतंत्राच्या दृष्टीने

आवश्यक अशी बाब असते. या प्रधान व्यक्तिरेखेला केंद्रस्थानी कल्पून अन्य व्यक्तींशी तिचे संबंध जोडता येतात. त्यामुळे बहुतांश कादंबऱ्यांमध्ये सुरुवातीपासून शेवटपर्यंत या प्रधान व्यक्तिरेखेचे सूत्र कायम ठेवलेले असते.

अशा विविध घटकांच्या साह्याने कादंबरीची रचना आकाराला येत असते.

## मराठी कादंबरीची पूर्वपीठिका

मराठी कादंबरीचा पूर्व कालखंड पाहता, हरिकेशवजींची 'यात्रिकक्रमण' ही मराठीतील भाषांतरित स्वरूपाची पहिली कादंबरी ठरते. १८४१ मध्ये जॉन बन्यनच्या 'पिलग्रिम्स प्रोग्रेस' या धार्मिक रूपकवजा कथेचे भाषांतर केले. या जाड 'शिळा-छाप' ठशाच्या पावणेचारशे पानी ग्रंथात मुळाप्रमाणे 'इहलोकापासून परवलोकास' केलेले हे यात्रिकक्रमण 'स्वप्नाच्या रूपकाने कथिले असे' अशी ग्वाही मथळ्यातच देण्यात आली आहे. संबंध ग्रंथभर विखुरलेली धर्मग्रंथातील अवतरणे मुळात कोठे आहेत, हे दाखविणारे परिशिष्ट शेवटी जोडले आहे. तरी तसेच हरि केशवजींनी चेम्बर्सकृत 'मॉरल टेल्स'चे भाषांतर (शालोपयोगी) नीतिग्रंथ म्हणून इ. स. १८४६ साली केले. त्यात वेगवेगळी ३८ प्रकरणे आहेत. पुढची कादंबरी इ. स. १८५७ साली प्रसिद्ध झालेली बाबा पदमनजी यांची 'यमुनापर्यटन' ही कालानुक्रमणे मराठीतील पहिली स्वतंत्र कादंबरी ठरते. या कादंबरीत त्या काळातील विधवांच्या शोचनीय अवस्थेचे चित्रण लेखकाने केले आहे. १८६१ मध्ये लक्ष्मणशास्त्री हळबे यांची 'मुक्तामाला' ही अद्भुतरसप्रधान कादंबरी प्रसिद्ध झाली. 'मुक्तामाला' ही कादंबरी घटना प्रधान आहे. या कादंबरीतील बहुसंख्य घटना या योगायोगावर अथवा अपघातावर आधारलेल्या आहेत. सुमारे १७५ पृष्ठांची ही कादंबरी असून यातील कथानक नऊ भागात विभागले आहे. प्रत्येक भागाच्या सुरुवातीला त्या त्या भागाचा ढोबळ सारांश देणारा सुभाषितवजा श्लोक दिला आहे. 'मुक्तामाला' ही कादंबरी लोकप्रिय होताच अशा अनेक

अद्‌भुतरम्य कादंबऱ्या त्या काळात निर्माण झाल्या. त्यातच नारो सदाशिव रिसबूड यांची 'मंजुघोषा' (१९६६) ही एक आहे.

'मोचनगड' ही मराठीतील पहिली खरीखुरी ऐतिहासिक कादंबरी म्हणता येईल. १८७१ मध्ये रा. भि. गुंजीकरांनी ती प्रकाशित केली. याच काळात आणखीन काही लेखक कादंबरीलेखन करत होते. त्यात गुंजीकरांच्या खालोखाल नाव घेता येईल असे लेखक म्हणजे विष्णू जनार्दन पटवर्धन. त्यांची हंबीरराव व पुतळाबाई (१८७५) ही ऐतिहासिक कादंबरी प्रसिध्द आहे. तसेच द्वा. ना. रणदिवे यांनी लिहिलेल्या 'शिक्षक' (१८८३) या कादंबरीत लॉर्ड डलहौसीच्या संस्थाने खालसा करण्यासाठी दत्तक नामंजूर धोरणाचा भाग पार्श्वभूमी म्हणून आला आहे. पण कादंबरी अपूर्ण राहिली आहे. रिसबुडांची दुसरी कादंबरी 'विश्वासराव' (१८७०) ही नावावरून सामाजिक असावी, असा काहीजणांचा ग्रह झाला होता. तथापि ही कादंबरीही मंजुघोषेच्याच वळणाची आहे. तर केशव लक्ष्मण जोरवेकर यांची 'विचित्रपुरी' (१८७०) ही कादंबरी संमिश्र वळणाची म्हणावी लागेल. त्याचबरोबर नाट्यकथार्णवाचे कर्ते शंकर मोरो रानडे यांनी लिहिलेली 'शिलादित्य' (१८७९-१८८४) ही कादंबरीही वातावरणाच्या दृष्टीने ऐतिहासिक म्हणावी लागते. तसेच विनायक बाळकृष्ण दामले यांची 'अवलिया' (१८८९) ही कादंबरी अनेक दृष्टीने वैशिष्ट्यपूर्ण आहे.

१८७४ पासून मराठी साहित्यक्षेत्रात नवे मन्वंतर अवतरले. कादंबरीस हरिभाऊंनी नवे रूप व नवा अर्थ दिला. त्यांची पहिली कादंबरी 'मधली स्थिती' १८८५ मध्ये प्रसिद्ध झाली. त्याआधीच्या काही प्रमुख मराठी कादंबऱ्या खालीलप्रमाणे आहेत.

| **लेखक** | **कादंबरी** |
|---|---|
| मुलेन्स | 'फुलमनी आणि करुणा' (१८५९), |
| मोरोबा कान्होबा | 'घाशीराम कोतवाल' (१८६३) |

| | |
|---|---|
| ना. कृ. गोखले | 'राजा मदन' (१८६५) |
| रा. भि. गोखले | 'सुलोचना आणि माधव' (१८६५) |
| साळूबाई तांबवेकर | 'चंद्रप्रभाविरहवर्णन' (१८७२) |
| ह. वि. बर्वे | 'रिचर्दाचे चरित्र' (१८७४) |
| वि. बा. सरनाईक | 'शृंगारमंजिरी' (१८७४) |
| ज. स. शास्त्री | 'सुवर्णमालिनी' (१८७४) |
| गो. शं. बापट | 'हरी आणि त्र्यंबक' (१८७५) |
| ना. स. रिसबूड | 'वसंतकोकिळा' (१८७६) |
| हळबेशास्त्री | 'रत्नप्रभा' (१८७८) |
| पां. गो. पारखी | 'मित्रचंद्र' (१८८०) |
| बा.ना. राव | 'शृंगारशेखर' (१८८१) |
| द्वा. ना. रणदिवे | 'शिक्षक-पूर्वार्ध (१८८३) |
| वा. रा. मोहनी | 'पीयूषभाषिणी आणि मदिरामंजिरी' (१८८३) |
| व्यं. आ. परब | 'क्लेशविमोचन' (१८८४) |
| अ. गो. इनामदार | 'मदनमंजिरी' (१८८५) |
| रा. का. लेले | 'चंद्रकला' (१८८५) |

ह. ना. आपटे यांना आजही एक थोर कादंबरीकार म्हणून मान्यता आहे. सामाजिक व ऐतिहासिक अशा अनेक कादंबऱ्या त्यांनी लिहिल्या आहेत. ह. ना. आपटे यांचा हेतू असा होता की, माणसाचे मन उन्नत करावे, ते मनुष्यत्वाकडून देवत्वाकडे न्यावे, सद्भिरूचीने संपन्न व्हावे. याच दृष्टीकोणातून त्यांनी महत्त्वाच्या दहा सामाजिक कादंबऱ्या लिहिल्या आहेत.

१) 'मधली स्थिती' (१८८५-८६)

२) 'गणपतराव' (१८८६-८७)

३) 'पण लक्षात कोण घेतो?' (१८९०-९३)

४) 'यशवंतराव खरे (१८९२-९५)

५) 'मी' (१८९३-९५)

६) 'जग हे असे आहे' (१८९७-९९)

७) 'भयंकर दिव्य' (१९०१-०३)

८) 'आजच' (१९०४-०६)

९) 'मायेचा बाजार' (१९१०-१२)

१०) 'कर्मयोग' (१९१३-१७)

हरिभाऊ आपटे यांनी एकापेक्षा एक सरस अशा ऐतिहासिक कादंबऱ्याही लिहिल्या आहेत. त्यांनी वीस-पंचवीस वर्षाच्या काळात सुमारे अकरा ऐतिहासिक कादंबऱ्या लिहिलेल्या आहेत. त्यामधील त्यांची 'म्हैसूरचा वाघ' (१८९०-९१) ही कादंबरी मिडोज टेलर यांच्या 'टिपू सुलतान' चे रूपांतर आहे. तसेच 'उष:काल' (१८९५-९७), 'रूपनगरची राजकन्या' (१९००-०२), 'गड आला पण सिंह गेला' (१९०३), सूर्योदय (१९०५-०६), मध्यान्ह' (१९०६-०८), 'सूर्यग्रहण' (१९०८-०९), 'कालकूट' (१९०१-११), 'चद्रगुप्त' (१९०२-०४), वज्राघात (१९१३-१५). अशा कादंबऱ्या ह. ना. आपटे यांनी लिहिल्या आहेत. त्यांच्या 'उष:काल', 'सूर्योदय', 'सूर्यग्रहण' व 'गड आला पण सिंह गेला' या कादंबऱ्या शिवकालीन व शिवचरित्रातील महत्त्वाच्या घटनांवर आधारित आहेत. आपल्या कल्पनाशक्तीच्या बळावर आपटे यांनी अतिशय अद्‌भुत पण वास्तवाशी, ऐतिहासिक वातावरणाशी इमान राखण्याची किमया या कादंबऱ्यातून साधली आहे.

ह. ना. आपटे यांच्या काळात कादंबरी लेखनास प्रारंभ करणाऱ्या ना. ह. आपटे यांनीही काही कादंबऱ्यांचे लेखन दीर्घकाळ केले आहे. 'हृदयाची श्रीमंती', 'दुरंगी दुनिया', 'न पटणारी गोष्ट', अशा काही सुरुवातीच्या कादंबरी लेखनानंतर त्यांनी पुढील काळात 'रत्नगुंफा (१९२९), 'दिवाकरदृष्टी' (१९२९), 'आम्ही दोघं' (१९३४), 'विफलता' (१९३६), 'अमरसंग्राम' (१९३९), 'साजणी'(१९४०), 'ऐरणीवर' (१९४४), 'एकटी' (१९४६) अशा अनेक कादंबऱ्या बोधप्रधान व कौटुंबिक स्वरूपाच्या लिहिल्या आहेत.

तसेच वा. म. जोशी यांनी 'रागिणी' (१९१५) ही कादंबरी लिहून मराठी कादंबरीचा पुढचा टप्पा गाठला. त्यांनी 'नलिनी' (१९१९) ही राजकीय थाटाची लहानशी कादंबरी लिहिली. त्यानंतर अकरा वर्षांनी 'सुशीलेचा देव' (१९३०) ही कादंबरी प्रसिद्ध झाली. आणि 'इंदू काळे सरला भोळे' (१९३५) ही एक कादंबरी लिहून वा. म. जोशी यांनी पत्रात्मक कादंबरीचा एक नवीन नुमना वाचकांपुढे सादर केला. जोशींनंतर आपणास श्री. व्यं. केतकर यांचा विचार करावा लागतो. केतकरांचे विचार प्रगतीचे व सुधारकी होते. त्यांची चौफेर दृष्टी, त्यांचा अनेक विषयांचा अभ्यास, त्यांचे दीर्घ चिंतन, त्यांचा जनप्रवास याचा प्रभाव कादंबऱ्यावर पडलेले दिसून येते. त्यांच्या कादंबऱ्यातून समजशास्त्रीय मते, त्यांची विवेचक दृष्टी यांचे दर्शन होते. त्यांच्या काही कादंबऱ्या अशा आहेत. 'गोंडवनातील प्रियंवदा' (१९१६), 'परागंदा' (१९२६), 'आशावादी' (१९२७), 'ब्राह्मणकन्या' (१९३०), 'गावसासू' (१९३०), 'विचक्षणा' (१९३७) 'भटक्या' (१९३८) या त्यांच्या अशा महत्त्वाच्या कादंबऱ्या आहेत.

ह. ना. आपटे यांच्यानंतर मराठी कादंबरीला वेगळे वळण लावण्याचे महत्त्वपूर्ण कार्य ना. सी. फडके यांनी केले. त्यांची पहिली कादंबरी 'अल्ला हो अकबर' (१९१६) ही भाषांतरित स्वरूपाची आहे. पण त्यांच्या लेखनाचे सर्व सामर्थ्य या कादंबरीत दिसून येते. त्यांनी आणखी काही

कादंबरीचे लेखन केले आहे. 'अटकेपार ' व 'कुलाब्याची दांडी' (१९२५), 'जादूगार' (१९२८), 'दौलत' (१९२९), 'निरंजन' (१९३२), 'कलंकशोभा' या त्यांच्या सुरुवातीच्या कादंबऱ्या आहेत. त्या खूपच लोकप्रिय ठरल्या. कारण फडके यांनी पांढरपेशा समाजातील स्त्री-पुरुषांच्या प्रेमकथा कादंबरीत मांडताना कादंबरीतील व्यक्तिरेखांचे स्वभाव, वातावरण निर्मिती, बांधेसूद कथानक, योग्य संवाद, रहस्य नीरगाठ, उकल असे थोडेसे वेगळे तंत्र फडके त्यांच्या कादंबऱ्यातून साकार करतात. स्त्री-पुरुषांचे प्रणयाचे शारीरिक चाळेही ते विनासंकोच वर्णन करतात त्याचबरोबर चोरट्या चुंबनांचे व प्रणयाच्या विविध छटांचे चित्रण करतात. फडके यांच्या कादंबरीतील नायक व नायिका देखणे आहेत. त्यांना कोणत्याही प्रकारचे संघर्ष करावे लागत नाही, तसेच कोणतीही आपत्ती त्यांच्यावर कोसळत नाही. त्यामुळे त्यांच्या नायक-नायिकांना कोणतीच चिंता नाही. फडके यांचे चित्रणाचे विलोभनीय विश्व काल्पनिक असले तरीही ते पाहिल्याबरोबर मराठी वाचक समाधानी होतो. हे मान्यच करावे लागते. वाचकांचे लक्ष सारखे गुंतवून ठेवण्यात त्यांची भाषाशैली कोठे कमी पडत नाही. त्यांनी तरुण स्त्री-पुरुषांच्या स्वप्नाळू वृत्तीची भूक स्वप्नरंजनात्मक कादंबरीच्या माध्यमातून भागविली आहे.

फडके यांनी कादंबरी क्षेत्रात आपले नवे युग निर्माण केले आहे. त्यांनी प्रेम, शृंगार, वासना यांचेही चित्रण केले आहे. हे करत असताना प्रेमाची पहिली भेट, विविध कलांचा आविष्कार, विविध प्रसंग, नाटक व चित्रपट यांचे ही योग्य उपयोजन केले आहे. अशा विविध चित्रणामुळे फडके यांची कादंबरी समृद्ध झाली आहे. त्यांनी 'प्रतिज्ञा', 'वादळ' 'अंजली', 'सुषमा', 'त्रिवेणी', 'चांदणी', 'काश्मिरी गुलाब', 'शाकुंतल', 'गीत जुने सूर नवे', 'खेळणी', 'सरितासागर', 'अमृतातेहि पैजासि जिंके!', 'बाजीराव', 'लग्नगाठी पडतात स्वर्गात' अशा अनेक कादंबऱ्या लिहिल्या आहेत. 'हेमू भूपाळी' ही त्यांची शेवटची कादंबरी ठरते. १९२९ सालच्या बेळगाव येथील

मराठी साहित्य संमेलनात शिवरामपंत परांजपे यांनी फडक्यांचा गौरव 'मराठी भाषेच्या दरबारात 'दौलत' उधळणारे महाराष्ट्राचे 'जादूगार' अशा शब्दांत केला होता. हेच त्यांच्या लेखनाचे व लोकप्रियतेचे साक्ष ठरते.

प्रा. ना. सी. फडके यांच्या काळातच विविध आणि विपुल कादंबरी लेखनात नाव कमावले ते ज्ञानपीठ विजेते वि. स. खांडेकर, ना. सी. फडके हे कलेसाठी कला या मताचे पुरस्कर्ते होते तर खांडेकर जीवनासाठी कला याचे आग्रही होते. खांडेकरांना उच्च शिक्षण घेता आले नसले तरीही त्यांचे जागतिक वाङ्मयाचे वाचन सखोल होते. म्हणून दारिद्र्याशी झगडताना त्यांनी आपल्या ध्येयाचा नंदादीप कायम तेवत ठेवला. कथा, नाटके, समीक्षा यांचे लेखन करणाऱ्या खांडेकरांना कथेसारखीच प्रसिद्धी त्यांच्या कादंबऱ्यांनाही मिळाली. १९३० साली त्यांची 'हृदयाची हाक' ही पहिली कादंबरी प्रसिद्ध झाली, त्यानंतर १९३१ मध्ये 'कांचनमृग ही कादंबरी प्रसिद्ध झाली, तर १९३४ मध्ये त्यांच्या दोन वेगवेगळ्या स्वरूपाच्या कादंबऱ्या प्रकाशित झाल्या, एक 'उल्का' ही कादंबरी आकाराने लहानशी पण गुणवैभवाने नटलेली आहे. आणि दुसरी 'दोन ध्रुव' ही समाजातील दोन ध्रुवांमधील अंतर चित्रित करते. एक ऐश आरामात जीवन जगणारा वर्ग तर दुसरा शारीरिक कष्ट, मानसिक संघर्ष करून कसे तरी पोट भरणारा वर्ग. असे चित्रण करणाऱ्या या दोन कादंबऱ्या आहेत.

पुढील काळात खांडेकरांनी 'दोन मने' (१९३८), 'पांढरे ढग' (१९३९), 'रिकामा देव्हारा' (१९३९), 'सुखाचा शोध' (१९३९), 'हिरवा चाफा' (१९३९), 'पहिले प्रेम'(१९४०), 'जळालेला मोहर' (१९४१), 'क्रौंचवध' (१९४२) या कांदबऱ्या लिहिल्या. 'क्रौंचवध' या कादंबरीच्या नंतर १३ वर्षांनी खांडेकरांनी 'अश्रू' (१९५३) ही कादंबरी लिहिली. त्यानंतर पौराणिक कथेचा नवा अर्थ विशद करणारी 'ययाति' (१९५९) लिहिली. या कादंबरीस खूपच लोकप्रियता

मिळाली व ज्ञानपीठ पारितोषिकास ती कादंबरी पात्र ठरली. त्यानंतर 'अमृतवेल' (१९६७) आणि 'सोनेरी स्वप्ने भंगलेली' (१९७७) या दोन कादंबऱ्या लिहिल्या. फडके-खांडेकर यांच्या कालखंडातील वाचकांच्या अभिरुचीचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य दिसते ते म्हणजे 'कलावादी फडके' आणि 'जीवनवादी खांडेकर' हे दोघेही वाचकांचे सारखेच आवडते कादंबरीकार होते. एका बाजूला फडक्यांची कुशल कारागिरी त्यांना मोहवीत होती तर दुसऱ्याबाजूला खांडेकरांचा ध्येयवाद लोभवित होता. त्यांच्या कादंबरीने नवोदित लेखकांवर जे संस्कार झाले, प्रभाव पडला त्यामुळे फडके, खांडेकरी पद्धतीच्या लेखनाची एक परंपराच उदयाला आली.

आधुनिक मराठी कादंबरीच्या क्षेत्रात फडके, खांडेकर यांच्या बरोबरीने नाव घेतले जाते ते एक यशस्वी पत्रकार, राजकारणाचे भाष्यकार, समीक्षक ग. त्र्यं. माडखोलकर यांचे, 'मुक्तात्मा' (१९३३) व 'भंगलेले देऊळ' (१९३४) या त्यांच्या सुरुवातीच्या कादंबऱ्या आहेत. त्यांच्या 'मुक्तात्मा' या कादंबरीने राजकीय विषयावरील कादंबरी म्हणून खूपच लोकप्रियता मिळविली आहे. त्यानंतर माडखोलकरांनी, 'शाप' (१९३६), 'कांता' (१९३९), 'दुहेरी जीवन' (१९४०), 'नागकन्या' (१९४१), 'नवे संसार' (१९४१), 'चंदनवाडी' (१९४३) अशा अनेक कादंबऱ्या लिहून आपली कादंबरीकार म्हणून ओळख वाचकांना करून दिली.

फडके, खांडेकर, माडखोलकर हे आधुनिक काळातील महत्त्वाचे कादंबरीकार जेव्हा लेखन करीत होते. तेव्हाच भा. वि. वरेकर यांनी 'विधवा कुमारी' (१९२८), 'धावता धोटा' (१९२६), 'चिमणी' (१९२६) 'परत भेट' (१९३४),'गोदू गोखले' (१९३२-३३), 'फाटकी वाकळ' (१९४१) यासारख्या कादंबऱ्या लिहून आपल्या हेतूप्रधान कादंबरी लेखनास वाव दिला. तसेच इतर काही 'वेणू वेलणकर', 'गीता', 'द्राविडी प्राणायाम', '१९१४ नंतर', 'शिपायाची बायको', 'मी

राम जोशी' अशा काही कादंबऱ्या लिहून वरेरकर यांनी सामाजिक समस्यांची वा उपेक्षित दलितांची चर्चा केलेली आहे.

वरेरकरांच्या सारखेच कादंबरीलेखन करणारे या काळातील कादंबरीकार वि. वा. हडप यांनी सामाजिक व ऐतिहासिक स्वरूपाच्या कादंबऱ्या लिहिल्या आहेत. 'बहकलेली तरुणी', 'वाकडे पाऊल', 'इष्काचा प्याला', 'मास्तरीणकाकू', सौंदर्याची फुलबाग, अशा काही सुरुवातीला लिहिलेल्या कादंबऱ्यात युवक-युवतींच्या प्रेमाचे, भडक चाळ्यांचे वर्णन असल्याने काहीशी सवंग लोकप्रियता वि. वा. हडप यांना मिळाली आहे. त्यांनी एकूण तेरा ऐतिहासिक कादंबऱ्या लिहिल्या आहेत. मात्र शिवकाळावरील एकच कादंबरी 'शिवशाहीचा शुभशकुन' ही लिहिली आहे. पुढील काळात 'उगवत्या सूर्याचा काळोख', 'आजचा प्रश्न', 'गोदाराणी', 'अन्नदाता उपाशी' इत्यादी कादंबऱ्यातून त्यांची साम्यवादी विचारसरणी स्पष्टपणे जाणवते.

राजकीय विचारांचा, प्रसंगांचा आधार घेऊन काही कादंबरीकारांनी याच कालखंडात लेखन केलेले आहेत. न. चिं. केळकर यांची 'नवलपूरचा संस्थानिक' ही राजकीय कादंबरी आहे. तसेच ना. के. बेहरे यांनी 'युद्धसंसार', 'जीवन रहस्य', 'हिंदू कोण', 'सीतावनवास', 'अहिल्योद्धार' यासारख्या कादंबऱ्यांचे लेखन केलेले आहेत. त्याचबरोबर 'मृत्यूच्या मांडीवर' -ल. ब. भोपटकर, 'खरा देशभक्त' - वा. कृ. भावे, 'आईची कृपा' - दा. न. शिखरे अशा काही राजकीय कादंबऱ्यांची निर्मिती झालेली आपणास दिसून येते.

याच काळात काहीसे वेगळ्या वळणाचे लेखनही काही कादंबरीकार करीत होते. कारण या काळात अनेक विविध राजकीय घटना घडत होत्या. त्यामुळे सामाजिक, कौटुंबिक चित्र बदलत होते. त्यातून विवेकवादी सुशिक्षितांची नवी पिढी नव्या वळणाच्या कादंबऱ्या निर्माण करत होती. त्यात आपणास पु. य. देशपांडे यांचा विचार करावा लागेल. त्यांची 'बंधनाच्या पलीकडे' (१९२७)

ही कादंबरी रूपवैशिष्ट्यांनी वेगळी ठरते. तर 'सुकलेले फूल' (१९३३) मध्ये प्रीतिविषयक तत्त्वज्ञान आले आहे. तर 'सदाफुली' (१९३३) ही त्यांची कादंबरी लक्षणीय ठरते आणि त्यानंतरची त्यांची 'विशाल जीवन' (१९३९) ही कादंबरी प्रसिद्ध झाली. व्यक्तिच्या अंतर्विश्वाचे चित्रण करणाऱ्या पु. य. देशपांडे यांनी पुढील काळात 'काळी राणी' (१९४१) व 'नवे जग' (१९४१) या दोन वेगवेगळ्या संघर्ष व विरोधभक्ती चित्रित करणाऱ्या कादंबऱ्या लिहितात. याच दरम्यान विश्राम बेडेकर यांची 'रणांगण' (१९३९) ही कादंबरी उदयाला आली. या कादंबरीला जागतिक महायुद्धाची पार्श्वभूमी लाभलेली आहे. आणि रणांगण ही कादंबरी मराठी कादंबरीच्या प्रवासात एक विकासाचा टप्पा ठरते. 'रणांगण' मुळे कादंबरीला एक बैठक प्राप्त झाली होती. तरीही पुढील काळात तशा स्वरूपाची कादंबरी उदयाला आली नाही ही पोकळी जाणवते.

विविध प्रकारांचे ऐतिहासिक, सामाजिक, राजकीय, कौटुंबिक, कल्पनारंजक अशा स्वरूपाचे कादंबरी लेखन विपुल प्रमाणात होत असतानाच स्त्रीमनाचा आविष्कार करणाऱ्या आणि थोडे बंडखोरपणाचे चित्रण कलात्मक पद्धतीने करून मराठी कादंबरीला वेगळे वळण लावणाऱ्या लेखिका विभावरी शिरूरकर या होत. १९३३ साली 'कळ्यांचे नि:श्वास' हे पुस्तक लिहून ताज्या व टवटवीत असणाऱ्या कळ्यासुद्धा दु:खाचे नि:श्वास कसे सोडीत असतात हे दाखवून दिले आहे. १९३४ साली त्यांची 'हिंदोळ्यावर' ही कादंबरी प्रसिद्ध झाली. 'विरलेले स्वप्न' (१९३५), 'दोघांचे विश्व' (१९५४) या विभावरी शिरूरकर यांच्या आणखी दोन कादंबऱ्या प्रसिद्ध झाल्या तर त्यांच्या 'बळी' विषयी आपण पुढे चर्चा करणार आहोत. त्यांच्याच 'जाई' (१९५३), 'शबरी' (१९६६) या कादंबऱ्या सुशिक्षित स्त्रियांच्या वैवाहिक जीवनात विलक्षण प्रकारच्या अडचणी कशा निर्माण होतात यांचे चित्रण करतात.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

तसेच गीता साने यांनी आपल्या 'निखळलेली हिरकणी' (१९३६), 'वठलेला वृक्ष' (१९३६), 'हिरवळीखाली' (१९३६), 'लतिका' (१९३७) 'फेरीवाला' (१९३८), 'आविष्कार' (१९३९), 'माळरानात' (१९४१), 'धुके आणि दहिवर' (१९४२), 'दीपस्तंभ' (१९४७) इत्यादी कादंबऱ्या लिहून स्त्री व पुरूष यांचे वैवाहिक आणि कौटुंबिक जीवन चित्र रंगविले आहे. तर मालतीताई दांडेकर यांनी मध्यमवर्गीय कुटुंबातील विविध नात्यांची, प्रश्नांची चित्रणे आपल्या 'मातृमंदिर' (१९४१), 'तेजस्विनी' (१९४३), 'वज्रलेख' (१९४६), 'कृष्णरजनी' (१९४७), 'काटेरी मार्ग (१९४८), 'संसारात पदार्पण' (१९४९), 'अमर प्रीती' (१९५०) इत्यादी कादंबऱ्यातून केलेली असून कौटुंबिक समस्या संयमशील वृत्तीने मांडल्या आहेत.

## 'बारोमास'पूर्व मराठी ग्रामीण कादंबरी

मराठी ग्रामीण कादंबरीचा इतिहास तसा १५० वर्षांचा आहे. ग्रामीण कादंबरी ही १९ व्या शतकापासून लिहिली जात होती. अनेक घटना, प्रसंग ग्रामीण जीवनाचे चित्रण वेगवेगळ्या कादंबऱ्यातून साकार झालेच आहे. मात्र ती ग्रामीण कादंबरी कोणत्या प्रवाहात समाविष्ट करावी ही बाब तत्कालीन समीक्षकांना चकवा देत असल्याने तशा स्वरूपाच्या कलाकृती उपेक्षितच राहिल्या आहेत. मात्र आजच्या समीक्षकांनी ग्रामीण कादंबरीचा अभ्यास करून तिचे वेगळेपण स्पष्ट करून दाखविले आहे. म्हणून डॉ. रवींद्र ठाकूर मराठी ग्रामीण कादंबरीच्या संदर्भात लिहितात, ''मराठी ग्रामीण कादंबरीने 'कादंबरी' या साहित्यप्रकारच्या प्रकृतीचे भान अगदी सुरुवातीपासून बाळगण्याचा प्रयत्न केला आहे. साहित्य ही एक सामाजिक घटना आहे, कादंबरी हा समकालीन समाजवास्तव चित्रित करणारा एक वाङ्मयीन दस्तऐवज आहे, याचे भान ग्रामीण कादंबरीने दाखवले आहे.''[११]

मराठी ग्रामीण कादंबरीचा विचार करताना आपणास लक्षात घेतले पाहिजे की, र. वा. दिघे यांनी आपल्या स्वत:च्या कादंबऱ्याना कोठेही 'प्रादेशिक' म्हटलेले नाही पण 'ग्रामीण' हा शब्द

वापरला आहे. म्हणजेच 'ग्रामीण' या शब्दाला इतिहास आहे. म्हणून आपण मराठीमधील पहिल्या ग्रामीण कादंबरीचा अभ्यास करू.

मराठीतील पहिली ग्रामीण कादंबरी 'बळीबा पाटील आणि १८७७ चा दुष्काळ' ही आहे काय? प्रा. सीताराम रायकर यांनी संपादित केलेल्या 'कृष्णराव भालेकर समग्र वाङ्मय' या ग्रंथात या प्रश्नासंबंधी थोडी चर्चा केली आहे. ते म्हणतात, '१८८८ मध्ये 'दिनमित्र' मधून क्रमश: प्रसिद्ध झालेल्या मजकुरास कादंबरी म्हणता येणार नाही कारण तिचा ऐवज तेवढा नाही, पात्रे, प्रसंग इत्यादी गोष्टीचा विचार करताना 'बळीबा पाटील' ही कादंबरी आहे असे म्हणता येणार नाही. तथापि दुसरे हस्तलिखितही याच सुमारास लिहिले गेले असावे असा तर्क केला तर 'बळीबा पाटील' ही पहिली ग्रामीण कादंबरी ठरेल.'

'पिराजी पाटील' ही धनुर्धारी यांनी १९०३ साली प्रसिद्ध केलेली पहिली मराठी ग्रामीण कादंबरी मानावी लागते. तेरा प्रकरणे असलेली १३० पानांची क्राऊन आकाराची ही कादंबरी आहे. छोटेखानी असली तरी ती अनेक दृष्टीने महत्त्वाची आहे. याच कादंबरीला मराठी ग्रामीण कादंबरीचा उगम मानला तर इ. स. १९०३ ते २००३ या दरम्यान मराठी ग्रामीण कादंबरीने खूप चढउतार पाहिले आहेत. त्यात कादंबरीच्या वाट्याला उपेक्षाच जास्त आल्या. त्याही सहन करून कादंबरीने आपले अस्तित्व टिकवले, आज त्या उगमाचा एक स्वतंत्र असा ग्रामीण प्रवाह आपणास पहावयास मिळतो.

'ग्रामीण' हा शब्द विस्तृत अशा भागाचे प्रतिनिधित्व करतो. विशिष्ट प्रदेशातील शहरी वाङ्मयालाही तो व्यापतो म्हणून आपण 'प्रादेशिकवाङ्मय' न म्हणता त्याला 'ग्रामीणवाङ्मय' म्हणणे योग्य ठरेल, म्हणून आनंद यादव लिहितात, ''प्रादेशिक हा शब्द वापरताना त्या त्या प्रदेशातील 'ग्रामीण स्वरूपाचे लोक-जीवन' असा अर्थ अभिप्रेत असतो. त्यामुळे शेवटी प्रादेशिक

कादंबरी ही 'ग्रामीण कादंबरीच' मानावी लागेल.''[१२] आजच्या घडीला अनेक ग्रामीण कादंबऱ्या निर्माण झाल्या आहेत. नागर-ग्रामीण संस्कृतीची सरमिसळ, अस्सल ग्रामीण बाज, ग्रामीण जीवन पद्धती, चाली, रीतिरिवाज, रूढी, परंपरा, बोली, भाषा या विविध वैशिष्ट्यांनी प्रादेशिक आणि ग्रामीण कादंबरीचा प्रांत समृद्ध करणाऱ्या ग्रामीण कादंबरीचा प्रवास पाहू.

मराठी ग्रामीण कादंबरीचा प्रवास पहात असताना आपणास असे दिसते की, मराठी ग्रामीण कादंबरी अनेक टप्प्यावर विकास पावत गेलेली आहे. हरिभाऊ आपटे यांचे समकालीन धनुर्धारी (रा. वि. टिकेकर) यांनी 'पिराजी पाटील' (१९०३) ही छोटी कादंबरी लिहिली पण तशी ही कादंबरी उपेक्षितच राहिली. या कादंबरीतील विषय तत्कालीन व शहरी वाचक वर्गास जवळचा वाटला नाही. मात्र अलिकडील काळात या कादंबरीकडे वेगळ्या दृष्टीकोणातून पाहिले जात आहे. ही दृष्टी ग्रामीण साहित्याविषयीची आहे. याच जाणिवेतून पहिली मराठी ग्रामीण कादंबरी म्हणून तिचा अभ्यास करणे योग्य ठरते. मात्र अनेक कारणांमुळे या कादंबरीची परंपरा निर्माण होऊ शकली नाही. जर ही परंपरा निर्माण झाली असती तर आज मराठी ग्रामीण कादंबरी अनेक अंगानी विकास पावली असती.

१९२५ च्या दरम्यान 'खेडूत सृष्टीचे कादंबरीकार' ना. वि. कुलकर्णी यांचे कादंबरीलेखन उदयास आले. त्यांनी जीवनानुभवाच्या वेगवेगळ्या वाटा शोधल्या आहेत. त्यांच्या प्रतिभेचा तो धर्मच आहे. कामगार जीवनाचा वेध घेण्यासाठी त्यांनी 'मजूर' ही कादंबरी लिहिली. तिला पुणे दक्षिणा प्राईज कमिटीचे बक्षिसही मिळाले. तर ग्रामजीवनाचा वेध घेण्यासाठी 'कसे दिवस जातील' (१९२५) ही कांदबरी लिहिले. या कादंबरीचे चांगल्या पद्धतीने स्वागत झाल्याने प्रोत्साहित होऊन त्यांनी 'शिपाई' (१९२५) ही कादंबरी निर्माण केली तर त्यांच्याच 'माणिक' (१९३१) या कादंबरीत राजाभाऊ या विलासी इनामदाराची कथा चित्रित झाली असून, 'पैसा' (१९२६) या कादंबरीत शेती

हा मूर्तिमंत पैसा आहे हा विचार मांडला आहे. अशा प्रकारचे विवेचन त्यांच्या कादंबऱ्यातून आले आहे. ग्रामीण साहित्याची परंपरा नसलेल्या काळात ना. वि. कुलकर्णी यांनी अशा स्वरूपाच्या कादंबऱ्या लिहून ग्रामीण कादंबरीच्या बाबत एक 'नवी दिशा' दाखविली आहे. म्हणूनच पुढील काळात नव्या वाटेवर काही श्रेष्ठ कादंबरीकार भेटतात त्याचा विचार करू.

ग्रामीण कादंबरीचा अभ्यास करताना साने गुरुजी यांचा विचार करावा लागेल. गुरुजींच्या लेखनास वाङ्मयीन प्रतिष्ठा लाभली नाही. याचे कारण त्याच्या साहित्याबद्दल समीक्षकात असणारी संभ्रमावस्था त्यांच्या साहित्याचे मूल्यमापन योग्य पद्धतीने झालेच नाही. याबद्दल कुसुमावती देशपांडे म्हणतात, ''पांडुरंग सदाशिव साने यांची रचना विपुल आहे. त्यांनी लहान मुलांसाठी 'गोडगोष्टी' लिहिल्या, मोठमोठ्या परकीय कादंबऱ्यांची सुटसुटीत व सुबोध रूपांतरे केली, बरीच स्वतंत्र रचनाही केली, परंतु या रचनेपैकी किती भाग उपदेशप्रधान बालवाङ्मयात जमा धरावा व किती कादंबरी प्रकारात समाविष्ट व्हावा हा प्रश्न उरतो.''[१३] साने गुरुजींच्या ध्येयवादाचे आणि विचारांचे पडसाद त्याच्या साहित्यात उमटतात. त्यांची 'श्यामची आई' (१९३५) ही कादंबरी अस्सल ग्रामजीवनाचे दर्शन घडविते म्हणून डॉ. रवींद्र ठाकूर यांना ती उत्कृष्ट 'ग्रामीण कादंबरी' वाटते.

मराठी ग्रामीण कादंबरीत र. वा. दिघे यांच्या कादंबऱ्या महत्त्वाच्या आहेत. 'पाणकळा' (१९३९) या कादंबरीच्या कथानकास वास्तववादी पार्श्वभूमी मिळाली आहे. कथानकातील अनेक प्रकारच्या विविधतेमुळे ही कादंबरी लोकप्रिय ठरली. तर 'सराई' (१९४३) ही त्याची सर्वाधिक लोकप्रिय कांदबरी आहे. या दोन्ही कादंबरीच्या संदर्भात, न. चिं. केळकर म्हणतात, 'हा कादंबरीचा सर्वात ताजा व नवा नमुना आहे.' 'निसर्गकन्या रानजाई' (१९४६) आणि 'गानलुब्धा मृगनयना' (१९४७) या दोन कादंबऱ्या प्रसिद्ध झाल्यानंतर दिघे यांच्या कादंबरीलेखनाचा वेगळाच पैलू प्रकट होतो. 'कार्तिकी' (१९६६) या कादंबरीत दलितावर होणारे अन्याय, अत्याचाराचे तर 'सोनकी'

(१९७८) या कादंबरीत आदिवासी जीवनाचे चित्रण आले आहे. र. वा. दिघे यांची 'हिरवा सण' (१९८०) ही शेवटची व अपूर्ण अशी कलाकृती आहे.

दिघे यांच्यानंतर आपणास ग्रामीण लेखक म्हणून बी. रघुनाथ यांचा विचार करावा लागतो त्यांची पहिली'ओ' (१९३६) ही कादंबरी प्रकाशित झाली आणि 'आडगावचे चौधरी' (१९५४) ही शेवटची कादंबरी प्रकाशित झाली. कादंबरी लेखनातून एक वेगळी वाट शोधण्याचा बी. रघुनाथ यांचा प्रयत्न होता हे दिसून येते. 'हिरवे गुलाब' (१९४३) ही त्यांची बरीचशी गाजलेली कादंबरी आहे. दुसरी एक महत्त्वाची कादंबरी 'जगाला कळलं पाहिजे' (१९४९). या कादंबरीत दोन जमातीमधील धार्मिक ताणतणावांच चित्रण मुख्यत: आले आहे. त्यांची 'म्हणे लढाई संपली' (१९४६) ही कादंबरी उल्लेखनीय आहे. म्हणून त्यांचे कादंबरी लेखन, मराठी कांदबरी लेखनाच्या विकासातला एक महत्त्वाचा टप्पा ठरतो. त्यांच्या लेखनाचे मूल्यमापन नजिकच्या काळात झाले असते तर समाजचित्रणाचे एक वेगळे भान मराठी कादंबरीकारांना आले असते.

श्रीराम अत्तरदे यांची 'सावलीच्या उन्हांत' (१९४०) आणि शं. रा. भिसे यांची 'जंगलातील छाया' (१९४५) या दोन वेगळ्या कादंबऱ्यातून 'भिल्ल-पवारी' या आदिवासी जमातींच्या जीवनाचे यथार्थ चित्रण आले आहे. तरीसुद्धा या कादंबऱ्यात वाङ्मयीन गुणवत्ता कमी असल्याने त्या कादंबऱ्या यशस्वी होऊ शकल्या नाहीत.

म. भा. भोसले यांची 'समरांगण' (१९४१) ही कादंबरी शेतकरी व जमीनदार यांच्यामधील संघर्षावर आधारित आहे. तर त्यांच्याच अजून दोन कादंबऱ्या एक 'उघड्या जगात' (१९४७) आणि दुसरी 'एका आईची लेकरं' (१९५०) तरी या तिन्ही कादंबरी लेखनावर वि. स. खांडेकरांच्या आदर्शवादाचा प्रभाव जाणवतो. एखादा लेखक दुसऱ्याच्या लेखन प्रेरणेमुळे, अनुकरणामुळे अपयशी कसा ठरतो, याचे उत्तम उदाहरण म्हणजे म. भा. भोसले होत. म्हणूनच त्यांच्या कादंबऱ्या

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

अपयशी ठरल्या आहेत. त्याचबरोबर द. र. कवठेकरांची 'रेशमाच्या गाठी' (१९४२) ही ग्रामीण जीवनाचे वर्णन करणारी कादंबरी अतिशयोक्ती भावनांच्या प्रकटीकरणामुळे ती थोडी डागाळली आहे. भरकटत गेली आहे. याच दरम्यानची वि. द.चिंदरकरांची 'महापूर' (१९४३) ही ग्रामीण कादंबरी आकाराला आली. खेड्यातील भयाण विद्रुप वास्तव, दारिद्रय याचे प्रत्ययकारी वर्णन या कादंबरीत आले आहे.

बा. सी. मर्ढेकर हे मराठी साहित्याच्या क्षेत्रात कर्तृत्व घडविणारे असे व्यक्तिमत्व आहे. त्यांची 'तांबडी माती' (१९४३) आणि 'पाणी' (१९४८) या दोन कादंबऱ्यामधून आधुनिकीकरणाने उद्ध्वस्त होणाऱ्या ग्रामीण संस्कृतीचे दर्शन घडविले आहे. तर 'गावगुंड' (१९४६) ही कादंबरी लिहून ग. ल. ठोकळ यांनी तत्कालीन परिस्थितीचे भान ठेवून त्यांचे प्रतिबिंब मराठी साहित्यात पाडण्याचा एक यशस्वी प्रयत्न केला आहे. या कादंबरीचे स्वरूप अतिशय आटोपशीर व वैशिष्ट्यपूर्ण आहे.

ग्रामीणबरोबरच प्रादेशिक कादंबऱ्या अभ्यासताना श्री.ना. पेंडसे यांचे नाव समोर येते. प्रादेशिक कादंबरी लोकप्रिय झाली ती त्यांच्यामुळेच, 'गारंबीचा बापू' (१९५२) ही पेंडसे यांची सर्वात लोकप्रिय तसेच सर्वत्र चर्चिली गेलेली आणि समीक्षकांनी अनेक पातळीवर मूल्यमापन केलेली कादंबरी आहे. १३५० पानाची प्रचंड आकाराची 'तुंबाडचे खोत' (१९८७) या कादंबरीत भोगवादीवृत्ती व्यक्तिरेखेच्या संदर्भात चितारली गेलेली दिसते. १२५ वर्षाचा अद्भुत घटनांनी भरलेला इतिहास या कादंबरीत आला आहे. त्यांच्या 'एल्गार' (१९४९), 'हद्दपार'(१९५०), 'रथचक्र' (१९६२),'लव्हाळी' (१९६६) 'ऑक्टोपस' (१९७२) इत्यादी कादंबऱ्यांनी मराठी कादंबरी समृद्ध केली आहे.

गो. नी. दांडेकरांनी विपुल साहित्यनिर्मिती केलेली आहे. त्यांच्या कादंबऱ्यात वास्तव जीवनाचा आविष्कार स्पष्टपणे जाणवतो. ते म्हणतात. 'शितू' मुळे मी कादंबरीकार म्हणून ओळखला जाऊ लागलो. 'शितू' (१९५३) व 'पडघवली' (१९५५) या कांदबऱ्यापासून त्यांना स्व:ची एक वेगळी शैली गवसली, 'पडघवली'चा परिचय लिहिताना ते लिहितात, ''प्राचीन समाजव्यवस्थेवर हे जे वादळ कोसळले आहे त्याचा साक्षी होऊन मी कथीत मनानं ही पडझड प्रत्यक्ष अनुभवली आहे.''[१४]

साठच्या दरम्यान सामाजिक व वाङ्मयीन परिस्थिती बदलली त्यातुनच दुसऱ्या पिढीचा नवीन लेखक वर्ग पुढे आला. स्वत: प्रत्यक्ष घेतलेल्या अनुभवातून सामाजिकदृष्टीने पहिल्यांदाच ग्रामीण साहित्य निर्माण करू लागला. हजारो वर्षे मुका राहिलेला हा वर्ग महाराष्ट्राच्या इतिहासात पहिल्यांदाच बोलता आणि लिहिता झाला. म्हणून डॉ. रवींद्र ठाकूर लिहितात, ''एकंदरीत १९६० नंतरच्या आशयाच्या आणि आविष्कारांच्या नव्या वाटा चोखाळणाऱ्या ग्रामीण कादंबरीत यादवांच्या कादंबरीचे स्थान महत्त्वाचे आहे. बोराडे-यादव यांच्या याच परंपरेत पुढे चंद्रकुमार नलगे, महादेव मोरे, शंकर खंडू पाटील, द. ता. भोसले, आनंद पाटील, पुरुषोत्तम बोरकर, अशोक व्हटकर, राजन गवस, व. बा. बोधे, उत्तम बंडू तुपे, माधव कोंडविलकर, वासुदेव मुलाटे, रामचंद्र पठारे, विश्वास पाटील, गणेश आवटे इत्यादी लेखकांची बदलत्या ग्रामीण वास्तवाला नव्या धिटाईने आणि आत्मविश्वासाने सामोरी जाणारी ग्रामीण कादंबरी अभ्यासावी लागते.''[१५] म्हणून बोराडे-यादव यांच्या कादंबऱ्या ह्या खऱ्या अर्थाने १९६० नंतरच्या ग्रामीण कादंबरीचा महत्त्वाचा टप्पा ठरतात. त्यांच्या कादंबऱ्यातून जीवनाशय व भाषा या माध्यमातून ग्रामीण संवेदनशीलतेचा आविष्कार होतो असे रा. रं. बोराडे यांच्या 'पाचोळा' व आनंद यादव यांच्या 'गोतावळा' या कादंबऱ्यांनी दाखवून दिले आहे.

१९७० च्या जवळपास ग्रामीण साहित्याची निर्मिती करणाऱ्या तिसऱ्या पिढीतील अनेक ग्रामीण साहित्यिकांवर अधिक मोठी जबाबदारी येऊन पडते. यात प्रामुख्याने भास्कर चंदनशिव, आनंद यादव, नागनाथ कोत्तापल्ले, मदन कुलकर्णी, वासुदेव मुलाटे, रा. रं. बोराडे, द. ता. भोसले, उत्तम तुपे, श्रीराम गुंदेकर यासारख्यांच्या कथातून न कळत नवे ग्रामीण भाग येऊ लागले त्यांनी ते अधिक जाणीवपूर्वक शोधून त्याचा आविष्कार केलेला दिसतो. त्यादृष्टीने या पिढीने बरीच मोठी जबाबदारी स्वीकारली आहे. पूर्व सूरींच्या अनुकरणातून ही पिढी बाहेर पडली आहे. ही पिढी निर्माण होण्यासाठी म. फुले, रा. शाहू यांची प्रेरणा महत्त्वाची ठरते. म्हणून डॉ. नागनाथ कोत्तापल्ले लिहितात, "म. फुले आणि रा. शाहू यांनी महाराष्ट्रभर उठविलेले वादळ आणि म. गांधी यांची ग्रामीणबद्दलची एक उदारमतवादी भूमिका. या महापुरुषामुळे ग्रामीण माणसाला एक प्रतिष्ठा असू शकते हे कळून ग्रामीण जीवन चित्रण करणे आवश्यक आहे. यांची प्रचिती येत गेली. या आणि यासारख्या कारणांमुळे १९२० ते ७० पर्यंतच्या पन्नास वर्षात ग्रामीण कादंबरी संख्येने विपुल प्रमाणात तर लिहिली गेलीच, परंतु ती गुणवत्तेनेही पुष्कळ प्रमाणात चांगली आहे."[१६] यामुळेच अनेक ग्रामीण लेखक पुढे आलेले दिसतात.

ग्रामीण भागात राहणाऱ्या सुशिक्षित तरुण वाचकालाही नागरी (शहरी) साहित्यापेक्षा ग्रामीण साहित्य अधिक जवळचे वाटते हे प्रमाण दिवसेंदिवस वाढतच चालले आहे. कारण त्याला स्वत:च्या भावभावनांचे अनुभवांचे प्रत्यक्ष प्रतिबिंब ग्रामीण साहित्यात अधिक निखळपणे जाणवते. अशा वाचकवर्गाला आपले वाटणाऱ्या ग्रामीण साहित्यातून मोठ्या प्रमाणात आत्माविष्काराचा प्रयत्न करावयाचा असेल तर त्यातून ग्रामीण जीवनातील विविध प्रेरणांचा आविष्कार होणे अगत्याचे आहे. अशा परिस्थितीत ग्रामीण साहित्याकडून आपल्या जीवनानुभवांच्या विविध प्रेरणांनीयुक्त असा आविष्कार करत राहणेच अधिक सयुक्तिक ठरेल. आनंद यादव यांनी आपले अनुभव घटना,

वास्तवाचा स्पर्श असतोच. अशा या आधुनिक कादंबरीच्या वाटचालीत आपणास ग्रामीण कादंबरीची वेगळीच दृष्टी जाणवते; ती म्हणजे अलिकडच्या काळातील ग्रामीण कादंबरीवर आशयाच्या व आविष्काराच्या बाबतीत शहरी साहित्यिकाच्या लेखनाचा प्रभाव पडलेला दिसून येत नाही. ही एक जिवंतपणाची, मराठी साहित्याने आपली अस्मिता ओळखल्याची खूण म्हणावी लागेल.

आंतराष्ट्रीय स्तरावरही मराठी माणूस अनेक क्षेत्रांमध्ये इतरांच्या तोडीस तोड असल्याचे दिसते. आपल्या कमतरतांची आणि प्रत्येक क्षेत्रात काम करण्यासारखे अजून पुष्कळ काही आहे याची जाण ठेवून आपण आत्मसंतुष्ट राहून चालणार नाही; हे खरे असले तरी मराठी माणसाने आजपर्यंत केलेली प्रगती इतिहासाला विसरता येणार नाही. या प्रगतीचे बरेचसे श्रेय स्वातंत्र्यपूर्वकाळातील प्रतिकूल परिस्थितीत ज्यांनी जिद्दीने कार्य केले त्यांना निःसशय जाते. याविषयी मधु कर्णिक लिहितात, ''महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी समतेचा आग्रह धरून पददलितांसाठी व खास करून मुलींसाठी शाळा काढल्या ग्रामीण भागातील मुले शिक्षणापासून वंचित राहू नयेत म्हणून राजर्षी शाहू महाराजांनी वसतिगृहे काढली. कर्मविरांनी अक्षरशः पायपीट करून एकेक मूल वेचून वसतिगृहामध्ये दाखल करून घेतले आणि 'कमवा व शिका' या स्वावलंबनाच्या कार्यक्रमांची त्याला जोड दिली''[१९] आज त्यातूनच शिक्षण घेऊन अनेक अंकुर वटवृक्ष झाले आहेत. त्यांचे प्रतिबिंब मराठी साहित्यात दिसत आहे. म्हणून त्याच साहित्यातील कादंबरी हा एक वाङ्मयप्रकार महत्त्वाचा ठरतो आहे.

'कादंबरी' हा साहित्यप्रकार शांत संथपणाने तपशिलात जाऊन सूक्ष्मपणे सामाजिक जाणीव व वास्तव व्यक्त करीत असतो. मोठा आशय, जीवनाकडे पाहण्याचे वेगवेगळे दृष्टिकोण, जीवनातील गुंतागुंत, व्यामिश्रता या सर्व गोष्टी ग्रामीण कादंबरीमध्ये आविष्कृत झालेल्या असतात. कादंबरीला

आशय दीर्घ आणि खोली लांब अभिप्रेत असते. म्हणूनच ग्रामीण जीवनाच्या आकलनाची जाण वाढविणारी ग्रामीण कादंबरी मराठीत विपुल प्रमाणात लिहिली जात आहे. १९४२ च्या चळवळीनंतर ग्रामीण जीवनावरील कादंबरीची निर्मिती मोठ्या प्रमाणावर होऊ लागली. ग्रामीण कादंबऱ्यात ग्रामीण जीवनाच्या चित्रणाबरोबरच ग्रामीण समस्यांची चर्चा होणे अपरिहार्य होते. अशा प्रकारच्या कादंबऱ्यांची वाट श्री रामतनय यांनी 'खरा उद्धार', 'जन्मभूमी' आदी कादंबऱ्यात दाखवलीच होती. त्याच वाटेने जाऊन श्री म. भा. भोसले यांनी 'समरांगण', 'एका आईची लेकरं', व श्री. चिदंरकर यांची 'महापूर' या कादंबऱ्यात ग्रामीण जीवनाच्या समस्याची चर्चा केलेली दिसते.

मराठी कादंबरीचे दुसरे शतक सुरु होत असतानाच ग्रामीण जीवनाला राष्ट्रीय जीवनात फारच महत्त्व आले. ग्रामीण जीवनाचे प्रत्यकारी चित्रण झाल्याशिवाय ग्रामीण जीवनावरील कादंबरीचे वैशिष्ट्य प्रकट होणार नाही याची जाणीव लेखकांना झाली. त्यामुळे ग्रामीण कादंबऱ्यांची पार्श्वभूमी अधिक उठावदार व वैशिष्ट्यपूर्ण दिसू लागली, या संदर्भात डॉ. नागनाथ कोत्तापल्ले लिहितात, ''१९६० नंतरच्या काळात मराठी साहित्याचे रूप संपूर्णत: बदलू लागले. सगळे उपेक्षित समाज घटक मुखर होऊ लागले. आपल्या आत्मसन्मानाचे भान त्यांना आले. आणि नवे नवे वाङ्मयीन प्रवाह बलिष्ठ होऊ लागले. याचा अर्थ असा की १८४८ साली म. जोतिबा फुले यांनी लावलेली नवी ज्योत १९६० नंतर अधिकच प्रकाशमान झाली. एका अर्थाने हे सगळे म्हणजे 'जोतिपर्व' आहे''[२०]

महाराष्ट्रात म. फुले, राजा राममोहन राय यांनी केवळ बौद्धिक क्रांती केली नाही, तर गावोगाव खेडोपाडी पायी फि रून प्रत्येक माणूस जागा केला, त्यामुळे आज नागपूरपासून सावंतवाडीपर्यंत उभी आडवी गावोगाव शिक्षणाची, विचार करण्याची केंद्रे आपल्याला दिसतात. सुदैवाने प्रतिकुल परिस्थितीतही मराठीच्या परिघाला स्पर्शणारे विशाल मनोवृत्तीचे लेखक वि. रा.

शिंदे, श्री. म. माटे, लक्ष्मीबाई टिळक, साने गुरुजी यांच्यापासून ते व्यंकटेश माडगूळकर, उद्धव शेळके, जयवंत दळवी, आनंद यादव, रा. रं. बोराडे, शंकरराव खरात, नागनाथ कोत्तापल्ले, सदानंद देशमुख यांच्यापर्यंत ह्या कालखंडात निर्माण झाले. मराठी समाजाचा हा परीघ कादंबरी या समृद्ध वाङ्मय प्रकारातून समर्थपणे व्यक्त झालेला दिसतो. म्हणून नव्या कादंबरीने मराठीचा कायापालट घडविला असे म्हणता येईल.

## ग्रामीण कादंबरी : 'बळी', 'बनगरवाडी' आणि 'धग'

'बळी' (१९५०) ही विभावरी शिरूरकर यांची 'मांग-गारूडी' समाजावर आधारित कादंबरी आहे. 'मांग-गारुडी' हा समाज या कादंबरीत केंद्रबिंदू आहे. मांग व मांगगारुडी हे दोन भिन्न स्थर या कादंबरीत चित्रित केलेले आहेत. कादंबरीचा नायक आबा हा मांग-गारुडी (खालच्या जातीचा) आहे; तर राही ही नायिका मांग (वरच्या जातीची) समाजाची आहे. दारिद्र्यात जीवन जगणाऱ्या लोकांचे चित्रण विभावरी शिरूरकर यांनी या कादंबरीत चित्रित केलेले आहे.

व्यंकटेश मागडगूळकर यांना कथा लेखनामध्ये यश मिळाल्यानंतर कादंबरी लेखनाकडे वळले, त्यांची 'पुढचं पाऊल' (१९५०) ही पहिली कादंबरी दलित कलावंताची कथा वर्णन करते. तर त्यांची 'बनगरवाडी' (१९५५) ही ग्रामीण कादंबरी मैलाचा दगड ठरते. त्या कादंबरीतून माडगूळकरांची प्रयोगशीलता प्रत्ययास येते म्हणून 'बनगरवाडी' एक श्रेष्ठ कलाकृती ठरते. 'वावटळ' (१९६४), 'कोवळे दिवस' (१९७९) ह्या त्यांच्या कादंबऱ्या उल्लेखनीय आहेत.

ग्रामीण कादंबरीच्या क्षेत्रात आण्णाभाऊ साठे यांच्या कादंबऱ्या रंजनप्रधान ग्रामीण कादंबऱ्या म्हणून ओळखल्या जातात. त्यांनी बरेच कादंबरी लेखन केलेले आहे. त्यात त्यांची 'फकिरा' (१९५९) ही कादंबरी एकूण मराठी कादंबरीवाङ्मयात महत्त्वाची ठरते. त्याचबरोबर ग्रामीण

कादंबरीच्या क्षेत्रात रणजीत देसाई यांनी 'बारी' (१९५९) 'माझा गाव' (१९६०) 'समिधा' (१९७९) या कादंबऱ्या लिहून ग्रामीण वास्तवाचा आविष्कार घडविला आहे.

उद्धव शेळके यांची 'धग' (१९६०) ही कादंबरी कठोर वास्तव जीवनाचा कलात्मक आविष्कार आहे. ही कादंबरी ग्रामीण कादंबरीत महत्त्वपूर्ण ठरते. जीवनाचे प्रखर वास्तवरूप चित्रित करणारी ही कादंबरी वाचकाला सुन्न बनविते. किनवट येथे प्रा. गोविंद मुनेश्वर यांना दिलेल्या मुलाखतीत शेळके म्हणतात, ''धग ही कादंबरी १९५६ साली लिहिली आणि १९६० साली ती प्रकाशित झाली. ही कादंबरी प्रामुख्याने आत्मचरित्रपर कादंबरी आहे, यातील सर्व पात्रे आपल्या स्वभावानं जगण्याचा प्रयत्न करतात व तिथंच संघर्ष सुरू होतो. प्रसिद्ध समीक्षक भालचंद्र फडके यांनी एके ठिकाणी लिहिलेलं आठवतं, 'रणांगण', 'बळी', 'धग' हे मराठी कादंबरीचे तीन टप्पे आहेत. 'धग'चा टप्पा अजून कुणीही ओलांडू शकत नाही.''[२१] कालबाह्य प्रेरणादायी भरकटलेल्या मराठी कादंबरीला पुन्हा मार्गावर आणण्याचे काम ज्या कादंबऱ्यांनी केले. त्यात 'धग' ही एक महत्त्वाची कादंबरी आहे. ग्रामीण कादंबरीच्या प्रवासात 'बळी', 'बनगरवाडी' आणि 'धग' महत्त्वाचा टप्पा ठरतात.

शंकर पाटील यांनी 'टारफुला' (१९६४) ही एकमेव कादंबरी लिहिली आहे. ही कादंबरी तीन भागात विभागली असून तीन पिढ्यांच्या सत्तासंघर्षाचा मोठा पट निर्देशित करते. तसेच मराठी साहित्याला समृद्ध करण्यात अनेक मुस्लिम साहित्यिकांनीही योगदान दिले. हमीद दलवाई या मुस्लिम लेखकाने लिहिलेली 'इंधन' (१९६५) ही कादंबरी वैशिष्ट्यपूर्ण आहे. या कादंबरीमध्ये, स्वातंत्र्योत्तर काळातील हिंदु-मुस्लिम समाज हा जातीयतेवरून कसा भांडतो आणि त्याची झळ सर्वच समाजाला कशी लागते याचे चित्रण ग्रामीण पातळीवरून केले आहे. तर द. ता. भोसले यांनी

'मी आणि माझा बाप' (१९६९) ही बाप आणि मुलगा यांच्यावर आधारित मनोरंजक अशी विनोदी ग्रामीण कादंबरी लिहिली आहे.

रा. रं. बोराडे यांच्या कादंबऱ्या ह्या साठोत्तर ग्रामीण कादंबरीचा टप्पा आहेत. त्यांची 'पाचोळा' (१९७१) ही ग्रामीण बोलीत लिहिलेली पहिलीच मराठी कादंबरी आहे. या कादंबरीला फारसे कथानक नाही. मात्र तिला लघुकादंबरीचा घाट आहे. हे मान्य करावे लागते. त्यांची 'सावट' (१९८७) ही कादंबरी वास्तववादी जीवन जगणाऱ्या ग्रामसंस्कृतीचे जडण-घडण कशी आहे. याचे दर्शन घडविते तर मराठवाड्यातील दुष्काळाची परिस्थिती चित्रण करणारी 'चारापाणी' (१९८९) ही त्यांची आणखीन एक कादंबरी प्रकाशित झाली. तसेच काही दिवसापूर्वी मराठवाड्यातील भूकंपावर आधारित 'इथं होतं एक गाव' (२०००) ही कादंबरी लिहिली आहे. ग्रामीण साहित्यातील त्यांचे स्थान मानाचे आहे हे मात्र निश्चित!

ग्रामीण कादंबरीकार म्हणून आनंद यादव यांचे स्थान निश्चितच श्रेष्ठ आहे. १९६० नंतरच्या लेखकात अग्रगण्य असलेले आनंद यादव यांनी कसदार पण अल्प लेखन केले आहे. त्यांची 'गोतावळा' (१९७१) ही पहिली कादंबरी. या कादंबरीने मराठी कादंबरीत आपले वैशिष्ट्यपूर्ण स्थान निर्माण केलेले असून 'माऊली' चे स्थान ही अनन्यसाधारण आहे. ग्रामीण तमाशा कलावंतांच्या उपेक्षित जीवनाचा आविष्कार करणारी 'नटरंग' (१९८०) ही कादंबरी त्या काळातील दस्तऐवज म्हणून नोंदली गेली. 'झोंबी' (१९९०) आणि 'नांगरणी' (१९९०) या कादंबऱ्यांनी आत्मचरित्रात्मक कादंबरीचा नवा मानदंड निर्माण केला आहे. आशयाच्या व आविष्कारांच्या नव्या वाटा चोखाळणाऱ्या ग्रामीण कादंबरीत आनंद यादवांच्या कादंबरीचे स्थान महत्त्वाचे आहे.

ना. धो. महानोरोंच्या 'गांधारी' (१९७३) या कादंबरीत त्यांच्या 'रानातल्या कविता' आणि 'वही' या संग्रहातील कवितांची मुळे ज्या परिसरात रुजलेली आहेत त्या परिसराच्या रंगछटा अधिक

गडदपणे व्यक्त झालेल्या आहेत. म्हणून ती एक मराठीतील वेधक कादंबरी ठरते. तर शंकर खंडू पाटील यांनी 'कुलवती' (१९७३), 'बेईमान' (१९७६) यासारख्या कादंबऱ्याचे लेखन करून ग्रामीण जीवनाचे दु:ख, दारिद्र्य मांडण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच चंद्रकुमार नलगे यांनी अखंडपणे कादंबरी लेखन केलेले आहे. 'आगीनफूल' (१९७४) मध्ये त्यांनी प्रतिव्रता सावित्रीने दिलेल्या लढ्याची कहाणी सांगितली आहे तर 'देवाची साक्ष' (१९७९) मध्ये एका धरणग्रस्त गावाच्या दुर्दैवाची कहाणी चित्रित केली आहे. देवदत्त पाटील यांनी 'संघर्ष' (१९७९), 'फेरा' (१९७९), 'व्याध' (१९८०), 'सिद्धनाग' (१९८०) यासारख्या काही कादंबऱ्याचे लेखन केलेले आहेत.

## इ. स. १९८० नंतरच्या मराठी ग्रामीण कादंबऱ्या

इ. स. १९८० नंतर ग्रामीण साहित्यिकांची पिढी उदयाला आली. यातील काही कादंबरीकारांचा आपण आढावा घेऊ.

रंगनाथ पठारे हे मराठी कादंबरीला समृद्ध करणारे या काळातील एक उल्लेखनीय कादंबरीकार आहेत. त्यांनी ग्रामीण कादंबरी 'रथ' (१९८४) मधून ग्रामीण साहित्यचळवळीचा घेतलेला अंतर्वेध, विषयाची निवड, मांडणी व भूमिका अशा विविध अंगानी महत्त्वपूर्ण आहे. तर 'हारण' (१९९०) या कादंबरीत त्यांनी ग्रामीण स्त्रीच्या वाट्याला येणाऱ्या दु:खाचे चढउतार समर्थपणे साकार केले आहेत, तर 'बगाड' (१९८४) या कादंबरीच्या माध्यमातून अशोक व्हटकर यांनी ग्रामजीवनाचे एक वेगळे रूप वाचकांसमोर ठेवले आहे. धार्मिक परंपरेमध्ये सापडलेल्या कुटुंबाचे चित्रण करणारी ही ग्रामीण कादंबरी आहे.

'उलट चालिला प्रवाहो' (१९८५) आणि गांधारीचे डोळे (१९८५) या दोन कादंबऱ्या लिहून नागनाथ कोत्तापल्ले यांनी आपला ग्रामीण साहित्यात ठसा उमटविला. ग्रामीण साहित्य

चळवळीतील एक महत्त्वाचे व्यक्तिमत्व म्हणून आपण त्यांना ओळखतो. मराठी कादंबरीच्या क्षेत्रात अतिशय झपाट्याने लेखन करणारे राजन गवस यांनी 'चौंडकं' (१९८५), 'भंडारभोग' (१९८८), 'कळप' (१९९१) 'धिंगाणा' (१९९२) या कादंबऱ्या लिहिल्या आहेत. अलिकडच्या काळात त्यांनी 'तणकट' (१९९८) ही कादंबरी लिहिली आहे. 'कागूद' आणि 'सावली (१९८६) या दोन लघुकादंबऱ्या आनंद पाटील यांनी लिहिल्या आहेत. त्यांच्या कादंबऱ्या ह्या बोराडे-यादव यांच्या नंतर महत्त्वाच्या मानल्या जातात. त्याचबरोबर भीमराव वाघचौरे यांनी'रानखळगी' (१९८८) आणि 'पाणघळी' या दोन कादंबऱ्यातून कौटुंबिक जीवनातले चित्रण चांगल्या प्रकारे चित्रित करण्याचा प्रयत्न केला आहे.

वासुदेव मुलाटे यांनी 'विषवृक्षाच्या मुळ्या' (१९८९) ही कादंबरी लिहून ग्रामीण भागातील सहकारक्षेत्र भ्रष्ट कसे बनले आहे याचे वास्तव चित्रण केले आहे. बदलत्या ग्रामीण वास्तवाचे एक आगळेवेगळे रूप या कादंबरीत टिपले आहे. तसेच महादेव मोरे यांची 'झोंबडं' (१९९०) ही बहुचर्चित कादंबरी आहे. मराठी साहित्यात ग्रामीण जीवनाचे चित्रण करणारे ते एक महत्त्वपूर्ण लेखक आहेत. त्याचबरोबर मोहन पाटील यांच्या कादंबऱ्या 'लिगाड' (१९९०) आणि 'खांदेपालट' (१९९०) या दोन कादंबऱ्याचा आपणास विचार करता येईल, त्यांची 'लिगाड' ही कादंबरी बदलते ग्रामीण वास्तव हे मुख्य आशयसूत्र घेऊन येते तर 'खांदेपालट' ग्रामीण भागातील विविध टप्यावर बदलणारे राजकारण दर्शविते.

विश्वास पाटील यांनी मोजकेच कादंबरी लेखन केले आहे. त्यांच्या 'पांगिरा' (१९९०), 'झाडाझडती' (१९९१) आणि 'महानायक' (१९९८) अशा काही महत्त्वाच्या कादंबऱ्या त्यांनी लिहिल्या आहेत. अनेक व्यक्तिचित्रणांच्या व घटनाप्रसंगाच्या मदतीने लेखकाने ही 'झाडाझडती' कादंबरी अत्यंत प्रभावीपणे व उत्कृष्ट शैलीत मांडली आहे. त्याचबरोबर रवींद्र शोभणे यांची

'कोंडी' (१९९२) ही ग्रामीण वास्तवाचा आविष्कार घडवू पाहणारी कादंबरी आहे. तर तानाजी राऊ पाटील यांनी एका शेतमजूर कुटुंबाची कहाणी 'आभाळ' (१९९२) या कादंबरीत चित्रित केली आहे. त्यांचीच 'रूपसावली' (१९९८) या नावाची कादंबरी प्रसिद्ध झाली आहे. त्यात शेतकरी जीवनाचे दु:ख चैतन्य याचे वर्णन करण्याचा प्रयत्न लेखकांनी केला आहे.

सुरेश शिंदे यांची 'सर्जा' (१९९४) ही कादंबरी ग्रामीण जीवनाचा आविष्कार दर्शविते, तर सदानंद देशमुख यांची 'तहान' (१९९८) ही कादंबरी विदर्भातील सारंगपूरसारख्या एका छोट्या गावात पाणी टंचाईमुळे निर्माण झालेल्या दुरवस्थेची कथा दर्शविते. दुष्काळाला पोटात घेऊन आकाराला आलेली कादंबरी आहे. तर दास मोरे यांची 'घोंगरवाडी' (२०००) ही कादंबरी ग्रामीण कादंबरीतील महत्त्वाचा टप्पा ठरते. असा ग्रामीण कादंबरीचा प्रवास आहे. आज ग्रामीण कादंबरीचा प्रवास थोडा क्षीण होत असतानाच सदानंद देशमुख यांनी दोन महत्वपूर्ण अशा ग्रामीण कादंबऱ्या लिहून ग्रामीण कादंबरीचा प्रवास पुढे चालू ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. म्हणून आपण 'बारोमास' (२००२) या कादंबरीचा अभ्यास पुढील प्रकरणात करणार आहोत.

## समारोप

मराठी ग्रामीण कादंबरीचा इतिहास हा १५० वर्षाचा आहे. ग्रामीण कादंबरी एकोणिसाव्या शतकापासून लिहिली जात होती. एकोणिसाव्या शतकात जी विविध स्थित्यंतरे झाली. त्यामुळे ग्रामीण कादंबरीला पोषक असे वातावरण निर्माण झाले आणि ग्रामीण कादंबरी निर्माण होऊ लागली. आजही ग्रामीण कादंबरी निर्माण होत आहे. म्हणून आपणास या ग्रामीण कादंबरीच्या संदर्भात आशावादी राहिले पाहिजे.

'कणाच्या शोधात परागंदा झालेली पाखरे
पुन्हा आपले घरटे शोधीत येतील
तेव्हा, तेव्हाच हे ओसाड गाव गोकुळ होईल...'

हाच आशावाद डोळ्यासमोर ठेवून ग्रामीण कादंबरीचा प्रवास सुरू आहे, असे आपणास दिसते.

## संदर्भग्रंथ


| | | |
|---|---|---|
| १. | हस्तक, उषा | मराठी वाङमयाचा इतिहास,<br>खंड पाचवा, भाग-पहिला, (संपा.रा.श्री. जोग)<br>पुनर्मुद्रण १९९९.<br>महाराष्ट्रसाहित्य परिषद, टिळक रस्ता, पुणे-३०.<br>पृष्ठ ४१४. |
| २. | Abrams, M.H. | A Glossary of Literary Terms, Edn. 3, New York, Holt, Rinehart and Winston Inc, 1971, p. 110. |
| ३. | Watt, Ian | The Rice of the Novel Studies in Defor, Richardson and Fielding Chatto and Windus, London, 1960, p. 10. |
| ४. | प्रेमचंद | साहित्य का उद्देश, प्रकाशक : हंस प्रकाशन,<br>इलाहाबाद.<br>प्रकाशन १९५४, पृष्ठ ५४. |
| ५. | अज्ञेय | शास्त्रीय समीक्षा के सिध्दांत, एस. चंद्र एण्ड कम्पनी (प्रा.) लि., रामनगर, नई दिल्ली ११० ०५५ व्दारा प्रकाशित व्दितीय भाग संपा. त्रिगुणायत गोविंद,<br>पृष्ठ ४१२. |
| ६. | नेमाडे, भालचंद्र | टीकास्वयंवर, संकेत प्रकाशन, औरंगाबाद आवृत्ती पहिली, सप्टेंबर १९९०, पृष्ठ १९८. |
| ७. | बापट, प्र.वा. आणि<br>गोडबोले ना.वा. | मराठी कादंबरीची वाटचाल, परिसंवाद, पुणे<br>कुलकर्णी ग्रंथकार, १९७२ |
| ८. | कुलकर्णी श्री.मा | कादंबरीची रचना, उन्मेष प्रकाशन, नागपूर<br>आवृत्ती पहिली, १९५६, पृष्ठ १५. |
| ९. | फडके ना.सी. | मराठी कादंबरीची वाटचाल, परिसंवाद, पुणे. |

| | | |
|---|---|---|
| १०. | हस्तक, उषा | साहित्य: अध्यापन आणि प्रकार, (वा.ल. कुलकर्णी गौरव ग्रंथ) मौज प्रकाशन गृह मुंबई, आवृत्ती पहिली, १९८७, पृष्ठ २७८. |
| ११. | ठाकूर, रवींद्र | मराठी ग्रामीण कादंबरी, स्नेहवर्धन प्रकाशन पुणे, आवृत्ती दुसरी २००१, पृष्ठ ८ |
| १२. | यादव, आनंद | ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि समस्या, मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे, आवृत्ती दुसरी १९८४, पृष्ठ ७६ व ७७ |
| १३. | देशपांडे, कुसुमावती | मराठी कादंबरी : पहिले शतक, मराठी साहित्य संघ, मुंबई, आवृत्ती पहिली १९७५, पृष्ठ ३१२ |
| १४. | दांडेकर, गो. नि. | पडघवली, मौज प्रकाशन, गृह मुंबई, आवृत्ती चौथी १९७९, परिचय |
| १५. | ठाकूर, रवींद्र | आनंद यादव, व्यक्ती आणि वाङ्.मय, मेहता पब्लिशिंग हाउस, पुणे, आवृत्ती पहिली १९९३, पृष्ठ-४६. |
| १६. | कोत्तापल्ले, नागनाथ | साहित्याचा अन्वयार्थ, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, आवृत्ती पहिली १९९६, पृष्ठ १३१ |
| १७. | भोसले , द. ता. | ग्रामीण साहित्य : एक चिंतन, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे-३०, प्रकाशन वर्षे १९८८, पृष्ठ ११४ |
| १८. | कोत्तापल्ले, नागनाथ | पाचोळा आणि दहा समीक्षक, साहित्य सेवा प्रकाशन औरंगाबाद, आवृत्ती पहिली १९८९, पृष्ठ ५९ |
| १९. | कर्णिक, मधु मंगेश | मराठी जगत् जागतिक मराठी परिषद, मुंबई, आवृत्ती पहिली १९८९, पृष्ठ २ |
| २०. | कोत्तापल्ले, नागनाथ | जोतिपर्व, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, आवृत्ती पहिली २०००, पृष्ठ १२ |

| | | |
|---|---|---|
| २१. | शेळके, उद्धव | दै. लोकमत, अक्षरंग पुरवणीतील मुलाखत 'साहित्यातून घ्यावयाचा असतो निर्भेळ आनंद' रविवार दिनांक १०/५/१९९२. |